# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक ११/०३/२०२५ चे ठराव**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८६१** | **विषय क्रमांक - ८६१**

**दिनांक - ११/०३/२०२५** | **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८६१<br>दिनांक -<br>११/०३/२०२५ | मा.अति.आयुक्त(१),स्थापत्य अ क्षेत्रीय यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/स्था/०७/कावि/२६/२०२५ दि.०३/०२/२०२५ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.५०४५ दि.०५/०३/२०२५ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये फर्निचर व इतर स्थापत्य विषयक कामे करणेस सुधारित प्रशासकिय मान्यता व सुधारित अंदाजपत्रक करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८६१<br>दिनांक -<br>११/०३/२०२५ | मा.अति.आयुक्त(१),स्थापत्य अ क्षेत्रीय यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/स्था/०७/कावि/२६/२०२५ दि.०३/०२/२०२५ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.५०४५ दि.०५/०३/२०२५ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत मुख्य प्रशासकीय इमारतीचा समावेश होतो. इमारतीच्या मुख्य कार्यालयात सर्व महत्त्वाचे विभाग तसेच अधिकारी यांचे कार्यालये व दालने आहेत. मनपाचे नवीन आकृतीबंधामुळे पदसंख्येत झालेली वाढ, पदोन्नती झालेले अधिकारी तसेच नव्याने रुजू होणारे कर्मचारी व अधिकारी यांची बैठक व्यवस्था करणे, फर्निचर व स्थापत्यविषयक कामे करणे, सेवानिवृत्ती झालेल्या व तेथे नव्याने आलेल्या अधिका-यांच्या केबिन मध्ये फेरफार करणे, वार्षिक स्वरुपाची देखभाल दुरुस्ती इत्यादी कामे उपरोक्त विषयांकित कामामधून करणेत येतात. तसेच सद्यस्थितीत मनपाचे व्हिडीओ कॉन्फरन्स रूम चे नुतनीकरण करणे, आपत्ती व्यवस्थापन कक्ष तयार करणे इत्यादी कामे तातडीने करणेचे सूचना मा. अतिरिक्त आयुक्त सो. यांनी दिलेल्या आहेत. तसेच समाजविकास विभागात बैठक व्यवस्था करणे, भांडार विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांची बैठक व्यवस्थेत बदल करणेसाठी पूर्ण विभागाचे फर्निचर मध्ये फेरफार करणे, सेवानिवृत्त अधिकारी यांचे जागेवर येणा-या अधिकारी यांचेकरीता बैठक व्यवस्था करणे इत्यादी कामे करणेची मागणी केली आहे. त्या दृष्टीकोनातुन सदरची कामे करणे व वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे. सदर इमारतीचे वार्षिक देखभाल दुरुस्तीचे कामकाज करणेसाठी निविदा काढून काम करणेत येते. मात्र आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात सदर कामास पुरेशी तरतूद उपलब्ध नसल्यामुळे उपरोक्त विषयांकित चालू कामास सुधारित प्रशासकिय मान्यता र.रु.१,५०,००,०००/- व सुधारित अंदाजपत्रक अंदाजे र.रु.१,३०,००,०००/- तयार करणे आवश्यक आहे. त्याकरिता येणा-या खर्चास |

| | |
|---|---|
| | मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८६२** **विषय क्रमांक - ८६२**

**दिनांक - ११/०३/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८६२<br>दिनांक -<br>११/०३/२०२५ | मा.क्षेत्रिय अधिकारी, आरोग्य फ क्षेत्रीय यांचेकडील पत्र क्र.फक्षेका/आ/३/कावि/३३/२०२५ दि.२०/०२/२०२५ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.५०५४ दि.०५/०३/२०२५ अन्वये, शहरातील वापरात नसलेले अथवा दुरावस्थेत अथवा मोडकळीस अवस्थेत (Dialpted Condition) असणारे सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांचा सर्व्हे करुन निष्कासित करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८६२<br>दिनांक -<br>११/०३/२०२५ | मा.क्षेत्रिय अधिकारी, आरोग्य फ क्षेत्रीय यांचेकडील पत्र क्र.फक्षेका/आ/३/कावि/३३/२०२५ दि.२०/०२/२०२५ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.५०५४ दि.०५/०३/२०२५ अन्वये, स्वच्छ महाराष्ट्र /भारत अभियान (नागरी) प्रकल्प अंमलबजावणी कक्षाकडील मा.आयुक्त सो. यांचे स्वमअक/३/कावि/१५५/२०२३, दिनांक-१६/१०/२०२३ आदेशान्वये कळविलेनुसार केंद्र शासनाचे स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविणेत येत आहे. नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे आणि सर्व नागरिकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर सर्वेक्षणामध्ये दरवर्षी सहभागी होत असते. मा. आयुक्त सो. यांनी सार्वजनिक व सामुदायिक शौचालय आढावा बैठकीमध्ये वेळोवेळी सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांचा सर्वे करून वापरात नसलेले शौचालय निष्कासित करण्याचे निर्देश दिलेले आहे. स्वच्छ सर्वेक्षणातील ओडीएफ, ओडीएफ++, वॉटर+ याकरिता सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांच्या स्वच्छतेचे मुल्यांकन करण्यात येते. शहरातील एकुण सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांपैकी काही शौचालये ही सिटी प्रोफाईलमध्ये नोंदविणेत आलेली आहेत. त्यामुळे शहरातील जी सार्वजनिक अथवा सामुदायिक शौचालये ज्यांचा अजिबातच वापर होत नाही अथवा दुरावस्थेत अथवा मोडकळीस अवस्थेत (Dialpted Condition) आलेली आहेत त्यांचा सर्व्हे करून सदर शौचालये निष्कासित करणे आवश्यक आहे. त्यानुसार "फ" क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील जी सार्वजनिक अथवा सामुदायिक शौचालये ज्यांचा अजिबातच वापर होत नाही अथवा दुरावस्थेत अथवा मोडकळीस अवस्थेत (Dialpted Condition) आलेली आहेत त्यांचा सर्व्हे झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग यांचे मार्फत करणेत आला असून त्यांनी क्र.झोनिपू/स्था/कावि/१०/३२/२०२५ दि.३०/०१/२०२५ अन्वये खालील शौचालय निष्कासित करणेकामी कळविले आहे. |

| प्रभा | निष्कासित | ब्लॉक | सि | शेरा/अभिप्राय | निरस्त |
|---|---|---|---|---|---|

| ग क्र. | करावयाचे शौचालय ठिकाण | संख्या | ट्स संख्या | | नंतरचा वापर |
|---|---|---|---|---|---|
| ११ | भोपळे चौक मेंन रोड, अजंठानगर. | ०१ | १० | सदर ठिकाणच्या शौचालयाचा वापर सद्यस्थितीत होत नसलेने व पुर्नवसन प्रकल्पाच्या जागेत सदरचे शौचालय येत असल्यामुळे शौचालय निष्काषित करणेबाबतचा विषय मा. महापालिका सभेपुढे मंजुरीसाठी सादर करणेत आला आहे. | S.R.A. पुर्नवसन प्रकल्प होणार आहे. |
| ११ | धोत्रे निवास, अजंठानगर. | ०१ | १७ | सदर शौचालयाचा वापर सद्यस्थितीत होत नाही. सदर शौचालय ६१ मी रस्ता रुंदीकरणात येत आहे. | बी.आर.टी. रस्ता वापर |
| ११ | दुर्गानगर, आरोग्य कार्यालयाजवळ. | ०२ | १४ | सदर शौचालय वापर सद्यस्थितीत होत नाही मोठ्या प्रमाणावर नादुरस्त स्थितीत आहे. सदर शौचालय ६१ मी रस्ता रुंदीकरणात येत आहे. | बी.आर.टी. रस्ता वापर |

उक्त प्रमाणे ‘फ’ क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील मनपा शौचालये निष्कासित करावयाची असून आरोग्य मुख्य कार्यालय यांचेकडील पत्र क्र.स्वमअक/३/कावि/१४२/२०२४, दि.१९/१२/२०२४ अन्वये, कळविलेनुसार महापालिकेच्या जागेवरील CT/PT/Urinals निष्कासित करणेस मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८६३** **विषय क्रमांक - ८६३**

**दिनांक - ११/०३/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८६३<br>दिनांक -<br>११/०३/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.स्था/कक्षे/कावि/प्र.क्र.२/११६/२०२५ दिनांक: - ०४/०३/२०२५ अन्वये, मनपाचे प्रभाग क्र. २ बो-हाडेवाडी मोशी प्राधिकरण येथील पेठ क्र. ५ व ८ (Pune International Exhibition and Convention Center-PIECC) येथील ताब्यात आलेले जागेत धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा उभारणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८६३<br>दिनांक - | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.स्था/कक्षे/कावि/प्र.क्र.२/११६/२०२५ दिनांक: - ०४/०३/२०२५ अन्वये, मा. महानगर आयुक्त, तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्र. जमिन व मालमत्ता विभाग/प्राधिकरण/२३५५, दि. २१/०७/२०२३ अन्वये, प्राधिकरणाच्या पेठ क्र. ५ व ८ |

| | |
|---|---|
| ११/०३/२०२५ | (Pune International Exhibition and Convention Center-PIECC) मोशी येथील क्षेत्र १०,११७.१४ चौ.मी. (२.५ एकर) जागेचा आगाऊ ताबा धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या 'स्टॅच्यु ऑफ हिंदुभूषण' स्मारकासाठी दिला आहे. तथापि सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. पुतळा/३११६/प्र.क्र. ३०८/२९, दि. ०२/०५/२०१७ नुसार राष्ट्रपुरुष /थोर व्यक्ती यांचे पुतळा उभारणेस मान्यता देणेचे अधिकार मा. जिल्हाधिकारी यांना प्रदान करणेत आलेले आहेत. विषयांकित पुतळयास मा. जिल्हाधिकारी यांची मान्यता घेणेसाठी उपरोक्त शासन निर्णय मधील मार्गदर्शक तत्वानुसार पुतळा उभारणा-या संस्थेने पुतळा उभारणेसाठी ठराव पारित करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने प्राधिकरण पेठ क्र. ५ व ८ (Pune International Exhibition and Convention Center-PIECC) येथील मनपाच्या ताब्यात आलेल्या जागेवर धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा १०० फूट उंच पुतळा उभारणेस मान्यता देणे आवश्यक आहे.<br><br>तरी सदर विषयास मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

सही/-
**(चंद्रकांत पोपट इंदलकर)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**